## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १२४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०३/२०१८

**१) संगनमत करुन मुलीच्या ईच्छविरुध्द विवाह करण्याचा उद्देशाने बळजरीने केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनाक ०७/०३/२०१८ चे २०.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हीचे नागपुर स्थित मुलासह लग्न जुळले होते परंतु आरोपी क्र. १ ने फिर्यादी विषयी चुकीचा फोन करुन फिर्यादीचे लग्न तोडले याबाबत तक्रार दिनांक ०६/०३/२०१८ रोजी झाली होती नंतर दिनाक ०७/०३/२०१८ ला यातील आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीचे सरळ घराचे आत प्रवेश करुन धारदार चाकुचा धाक दाखवुन मारझोड करुन फिर्यादीचे आईचे केस ओढले व वडीलाला निघुन जाण्यास सांगीतले फिर्यादीस मारहान करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीची लहान बहीन ही सोडविण्यास आली असता तीचे गालावर मारुन आरोपी क्र. २ हा आरोपी क्र. १ यास हीचे तुकडे कर असे फिर्यादीला उद्देशुन बोलत होता आरोपी क्र. १ याने केस पकडुन तिचे स्वत:चे घरातनु मारत मारत चौरस्त्यावर आणले व लाथाबुक्यांनी मारहान केली, यातील आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे इच्छेविरुध्द विवाह करण्याचा उद्देशाने बळजरीने केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५०,३६६,३५४,२९४,५०४,५०६,३४ भादवी. सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. म्हैसकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**२) पायावर उभारीने, तुतारीने व हाथाबुक्यांने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक ०८/०३/२०१८ चे १७.१५ यातील फिर्यादी कैलास भुसाजी खांदाळे वय ४८ वर्ष, रा. बेटाळा हे होळीचे २ दिवसा अगोदर ग्रा. पं. जवळ झाडांना पाणी टाकण्याकरीता गेला असता ग्रा.पं. जवळ राहत असलेल्या देवकन्या मडावी यांनी फिर्यादीला बोलावुन सांगीतले की नितुन मडावी याने माझे घरात घुसुन मारुन जखमी केले हे सागत असतांना यातील आरोपीचे सुनेला वाटले की देवकन्या मडावी हीला फिर्यादी मदत करतो, याच कारणावरुन यातील फिर्यादी हा आपल्या मुलासह सायकल रिक्शाने घरी येत असतांना यातील आरोपीने आपली बैल बंडी फिर्यादीचे रिक्साला आडवी करुन थांबविले आणि आरोपी हा खाली उतरुन फिर्यादीचे पायावर उभारीने, तुतारीने आणि हाथाबुक्यांने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३४१,३२३,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक २८/०१/२०१८ चे १९.०० यातील अर्जदार हे त्याचे घरासमोर रस्त्याचे कडेला शेकोटी शेकत असतांना यातील दोन्ही आरोपीतांनी विनाकरण अर्जदारासोबत वाद घालुन अर्जदार हे अनुसुचीत जातीचे आहेत हे माहीत असुन देखील त्यांना उद्देशुन जाती वाचक व अश्लिल शब्दात शिवीगाळ केली असल्याचे अर्जदाराचे लेखी तक्रारी अर्जाचे चौकशी अहवाल वरुन तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी यांचे अभियाप्रा वरुन सरतर्फे फिर्यादी पोउपनि. बोरखडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ५०४,५०६ भादवी. सहकलम ३(१)(आर)(एस)अ.जा.ज.अ.प. का.सुधारीत अधिनीयम २०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी टिक्कस हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणांवरुन लोखंडी फुकणी मानेवर,पाठीवर,डोक्यावर मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक ०८/०३/२०१८ चे ०८.३० यातील फिर्यादी सौ. कल्पना भिमराव कुनभरे वय ३५ वर्ष, रा. मुरमाडी/सावरी/केसवाडा फाटा हे आपल्या मुलास जेवण भरवत असतांना आरोपी पतीने तु गॅस सुरु ठेवुन मुलास जेवण का भरवत आहे. असे बोलुन चुलीजवळील धुर फुकण्याची लोखंडी फुकणी उचलुन फिर्यादीचे मानेवर, पाठीवर, डोक्यावर, मारहान करुन आपखुशीने दुखापत केल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन लाकडाच्या काठीने मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद  . :—**

दिंनाक ०८/०३/२०१८ चे ११.४५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादीचा मुलगा याने पोळया ठेवण्याची चाळणी फिर्यादीस मागीतली ती फिर्यादीने दिली नाही या कारणावरुन यातील आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन तु माझे घरात राहु नको तु आपली वेगळी राहा असे बोलुन अंगणात ठेवलेल्या फोडलेल्या लाकडाच्या काठीने डावे डोळयाचे खाली, डोक्यावर, पाठीवर, डाव्या मांडीवर मारुन आपखुशीने दुखापत केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२५,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**६) पर्समधील आतल्या पाकीटातुन एटीएम कार्ड, पॅनकार्डची चोरी  . :—**

दिंनाक ०८/०३/२०१८ चे १५.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी सौ. छाया भिमराव टेंभुर्णे वय ५२ वर्ष, रा. विदर्भ हाऊसिंग कॉलोनी जि.प.चौक हनुमान मंदीराचे मागे भंडारा हे शासकीय कामा निमीत्त लाखनीला जाण्या करीता बस स्थानक भंडारा येथे गेले असता बस मध्ये चढत असतांनी कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे पर्स मधुन आतल्या पाकीटातुन फिर्यादीचा अलाहाबाद बॅकेचा एटीएम, बॅक ऑफ इंडीयाचा एटीएम कार्ड, पॅन कार्ड व प्रगती मागास वर्गीय महिला संस्थाचे नावाचा पॅन कार्ड नगदी ४,६००/—रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद  .  —**

दिंनाक ०८/०३/२०१८ चे १२.०० ते १३.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी राजेश देवीदास गव्हाळे वय २९ वर्ष, रा. विभागीय भंडार शाखा रा. प. भंडारा हा अपले कार्यालयात शासकीय कामकाज करीत असतांना आरोपी याने शासकीय कामकाजा वरुन वाद घालुन दोन कवडीचा माणुस तु हलकट जातीचा आहेस तुला पाहुण घेईल, असे जातीवाचक शिवीगाळ कार्यालयात हजर असलेल्या कर्मचाऱ्यांना समोर करुन अपमानीत करुन धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन रा.प.म.भंडारा कडे तक्रार दिली परंतु त्यांनी काणतीच दखल घेतली नाही परंतु म्हणुन उशीरा लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ५०४,५०६ भादवी. सहकलम ३(आय)(१)(आर)(एस)अ.जा.ज.अ.प्र.का १९८९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा जोगदंड हे करीत आहेत.

**८) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद  .  —**

दिंनाक ०८/०३/२०१७ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी ह एकाच वार्डात राहत असुन यातील आरोपी हे एकाच वार्डात राहत असुन यातील आरोपी हे अवैध दारु विक्रीचा व्यवसाय करतात व फिर्यादीस नेहमी जातीचे नावे घेवुन शिवीगाळ करतात यातील दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने व पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ५०४,३४ भादवी. सहकलम ३(आय)(१)(आर)(एस)अ.जा.ज.अ.प्र.का १९८९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा जोगदंड हे करीत आहेत.

**९) गळफास लावुन इसमाचा मृत्यु  . :—**

दिंनाक ०८/०३/२०१८ चे १५.३० वाजता पुर्वी यातील मृतक नागेश रामभाऊ वाघाये वय ३९ वर्ष, रा. केसलवाडा वाघ याने एचआयव्हीचे आजाराला कंटाळुन स्वतःचे घराचे मायालीला दुपट्टा बांधुन स्वतः गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी योगेश रामभाऊ वाघाये वय ३२ वर्ष, रा. केसलवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत.

**१०) अवैध देशी/जुगार दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०८/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, सिहोरा व लाखांदुर येथे अवैध देशी दारु/ जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १२ लिटर हातभट्टी दारु किंमती १२००/–रु. ६ लिटर ५७० मिली लिटर देशी दारु किंमती २१५८/–रु. तसेच जुगारातुन किंमती ८५७ असा एकुण ४,२१५/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०८/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी किंमती ०३ तीन सिटर वाहनाकरीता ०७ ईतर वाहनांवरती – ८६ केसेस करण्यात आले आहे.


(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५


**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.